# हॉट मिक्स प्लॅन्ट, म.न.पा.

1. म.न.पा. हॉट मिक्स प्लॅन्ट विभागाद्वारे नागपूर शहरात विविध ठिकाणी 12.0 मी. पेक्षा वरील रस्त्यावरील खड्डे/पॅचेसची दुरूस्ती करण्यात येते. या कामाकरीता मनपाचे विविध झोनचे अधिकारी व मा. पदाधिकारी यांच्या पत्राद्वारे तसेच भ्रमणध्वनीद्वारे खड्डे/पॅचेस दुरूस्ती करण्याकरीता विभागाला तक्रार प्राप्त होते. या अनुषंगाने विभागातील कर्मचारी तक्रार प्राप्त च्या अनुषंगाने रस्त्याचे निरीक्षण करण्यात येते व निरीक्षणास आढळुन आलेले खड्डे तसेच सदर रस्ता कोणत्या विभागाकडे आहे याबद्दल उप विभागीय अभियंता यांना अवगत करण्यात येते व यासंबंधी सदर तक्रार बाबत व खड्डे दुरूस्ती करण्याबाबत कार्यकारी अभियंता (प्र.) यांना सुद्धा अवगत करण्यात येते. त्यांच्या मंजुरी उपरान्त विभागाद्वारे स्वतःचे अस्तित्वात असलेले उष्ण मिश्रीत डांबरद्वारे रस्त्याची दुरूस्ती करण्यात येते. हा विभाग कार्यकारी अभियंता (प्र.) यांच्या देखरेखी मध्ये काम करण्यात येते.
2. कार्यकारी अभियंता (प्र.) यांच्या अधिनस्त राहून सर्व अधिका-यांना आपल्या कार्यसुची प्रमाणे अधिकार प्राप्त आहेत.

   कर्तव्यसुची अनुच्छेद क्र. 4 वर दशविलेल्या प्रमाणे आहे.
3. कोणतेही अर्ज कार्यकारी अभियंता (प्र.) किंवा उपविभागीय अभियंता यांच्या मार्फत शाखा अभियंता व स्था. अभि.सहा. पर्यन्त निर्गमीत करण्यात येते. त्याअनुसार स्था.अभि.सहा./शाखा अभियंता यांनी मौका चौकशी करून तसा अहवाल व त्याबाबतचा प्रस्ताव उपविभागीय अभियंता मार्फत कार्यकारी अभियंता (प्र.) यांना पाठविण्यात येते.
4. स्वतःची कार्य पार पाडण्याकरीता कर्तव्यसुची आधारे पालन खालील प्रमाणे –

## मेकॅनिकल इंजिनिअर :– कर्तव्यसुची

➢ हॉट मिक्स प्लॅन्ट विभागाचे विभागप्रमुख म्हणून खालीलप्रमाणे कर्तव्य पार पाडणे –

(i) हॉट मिक्स प्लॅन्ट विभागाचे काम सुरळीतपणे व योग्यरितीने पार पाडणे.

(ii) अधिनस्त कर्मचा-यांकडून विभागाशी संबंधीत सर्व कामे पार पाडणे.

(ii) विभागीय कामावर देखरेख व नियंत्रण ठेवणे.

(iv) विभागीय कर्मचा-यांचे गोपनीय अहवाल सादर करणे.

(v) विभागीय कामांकरीता आहरण व संवितरण अधिकारी म्हणून काम पाडणे.

## कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) :– कर्तव्यसुची

(i) हॉट मिक्स प्लॅन्ट विभागीय वाहने व मशीनरीजचे देखभाल व दुरूस्ती कामे पार पाडणे.

(ii) विभागीय वाहने व मशीनरीजची नियमीतपणे तपासणी करून अहवाल सादर करणे.

(ii) विभागीय वाहने व मशीनरीजना गरजेनुसार इंधन पुरवठा करणे व त्यावर नियंत्रण ठेवणे.

(iv) विभागीय वाहने व मशीनरीजच्या दुरूस्तीच्या कामावर देखरेख ठेवणे तसेच या संबंधीत

देयकाच्या प्रक्रियेतील सर्व कामांची पूर्तता करणे.

(v) वाहने / मशीनरीज संबंधीत सर्व अभिलेखांची तपासणी करून सर्व अभिलेखे व्यवस्थित ठेवणे.

(vi) विभागीय ड्रायव्हर्स / ऑपरेटर्स यांचे कडून गरजेनुसार व योग्य रितीने कर्तव्ये पार पाडणे.

(vii) विभागीय वाहने व मशीनरीजच्या दुरूस्तीच्या कामाकरीता आवश्यकतेनुसार अग्रीम काढणे व काढलेल्या अग्रीमचे वेळेवर नियमीतपणे समायोजन करणे.

## कनिष्ठ अभियंता (स्थापत्य ) :– कर्तव्यसुची

हॉट मिक्स प्लॅन्टचे विभागप्रमुख यांचे माताहात खालीलप्रमाणे कर्तव्य पार पाडणे

(i) हॉट मिक्स प्लॅन्ट विभागाअंतर्गत होणा-या सर्व स्थापत्य कामांशी संबंधीत बाबींवर (डांबर, सर्व प्रकारची खडी, लेबर, रोड कटिंग इत्यादी) पुढील प्रमाणे देखरेख व नियंत्रण ठेवणे.

**(a) खडी :–**

- विभागाकरीता आवश्यकते नुसार खडी खरेदी करण्याची सर्व प्रक्रिया पार पाडणे.
- कंत्राटदाराने पुरवठा केलेल्या खडीचे ढिग (Stack) लावून मोजमाप घेवून संबंधीत बाबींचे अभिलेखे तयार करून जतन करणे.
- कंत्राटदारामार्फत विभागास पुरवठा केलेल्या खडी व इतर साहित्याची गुणवत्ता चाचणी विषयक सर्व बाबी पार पाडणे.
- खडी संबंधीत देयकाच्या सर्व कामांची पूर्तता करणे.
- रस्त्यावरील खड्डे / पॉटहोल्स दुरूस्ती व तसेच डांबरीकरणाच्या कामाच्या अनुषंगाने रस्ते बांधकाम साहित्य (विविध आकाराची खडी, मुरूम, डस्ट इत्यादी) चा निरंतर साठा हॉट मिक्स प्लॅन्ट परिसरात उपलब्ध ठेवणे.

**(b) डांबर व हिनकॉल (थंडे डांबर) :–**

- विभागाकरीता आवश्यकते नुसार डांबर व हिनकॉल (थंडे डांबर) खरेदी करण्याची सर्व प्रक्रिया पार पाडणे.
- कंत्राटदारामार्फत पुरवठा केलेल्या डांबर व हिनकॉल (थंडे डांबर) चा Invoice प्रमाणे परिणाम (Quantity) तपासणी करण्याची सर्व कारवाही पार पाडणे.
- हॉट मिक्स प्लॅन्ट मध्ये प्राप्त झालेले डांबराच्या परिमाणानुसार साठा करून डांबर आवश्यकते प्रमाणे उपयोगात आणण्याची प्रक्रिया पार पाडणे व त्याबाबतची अभिलेखे तयार करून जतन करणे.
- कंत्राटदारामार्फत विभागास पुरवठा केलेल्या डांबर व हिनकॉल (थंडे डांबर) गुणवत्ता विषयक सर्व बाबी पार पाडणे.
- डांबराचा कामासंबंधीत देयकाच्या सर्व कामांची पूर्तता करणे.

- डांबर व हिनकॉल (थंडे डांबर) च्या खरेदीकरिता अग्रीम काढणे व काढलेल्या अग्रीमचे नियमीतपणे समायोजन करणे.
- रस्त्यावरील खड्डे/पॉटहोल्स दुरूस्ती व तसेच डांबरीकरणाच्या कामाच्या अनुषंगाने डांबर व हिनकॉल (थंडे डांबर) चा निरंतर साठा हॉट मिक्स प्लॅन्ट परिसरात उपलब्ध ठेवणे.

**(c) लेबर :–**

- विभागकरीता आवश्यकतेनुसार लेबर पुरवठयाच्या कामाची सर्व प्रक्रिया पार पाडणे.
- विभागीय डांबरीकरणाच्या व इतर कामानुसार लेबर कंत्राटदारामार्फत साईटवर लेबर लावून डांबरीकरणाची खड्डे दुरूस्तीची, व इतर कामे पार पाडणे.
- लेबर कंत्राटदारामार्फत योग्य रितीने व नियमानुसार काम करून घेणे.
- लेबर कंत्राटदाराने केलेल्या सर्व कामांचे अभिलेखे तयार करून जतन करणे.
- लेबर पुरवठयाबाबत देयकाची सर्व कामांची पूर्तता करणे.
- रस्त्यावरील खड्डे/पॉटहोल्स दुरूस्ती व तसेच डांबरीकरणाच्या कामाच्या अनुषंगाने हॉट मिक्स प्लॅन्ट विभागात लेबरची निरंतर उपलब्धता ठेवणे.

**(d) रोड कटिंग :–**

- रोड कटिंगच्या कामाच्या अनुषंगाने विभागास प्राप्त झालेल्या अर्जांची तपासणी करणे.
- रितसर प्राप्त झालेल्या अर्जांच्या अनुषंगाने प्रत्यक्ष साईटवर जावून व तसेच इतर संबंधीत बाबींची शहानिशा करून त्याप्रमाणे नस्ती तयार करणे.
- सदर नस्तीस सक्षम प्राधिका-याची मंजूरी झाल्यानंतर अर्जदाराकडून मागणीपत्राद्वारे रोडकटिंग शुल्क मनपात जमा करून रोड कटिंगच्या परवानगीबाबत कार्यवाही करणे व या संबंधीचे अभिलेखे तयार करून जतन करणे.
- परवानगी दिल्यानंतर रोड कटिंगच्या कामावर देखरेख ठेवून योग्य रितीने रिस्टोरेशनचे काम करून घेणे व त्याबाबतचा अहवाल सादर करणे.
- विविध अर्जदारांमार्फत रोड कटिंगच्या अनुषंगाने विभागास प्राप्त झालेल्या बॅंक गॅरंटी विहीत मुदतीनंतर मुदतवाढीची/परत करण्याची कार्यवाही करणे.
- नागपूर शहर सिमेअंतर्गत मनपाच्या अस्तित्वात असलेल्या डक्टची व तसेच विविध एजेन्सीद्वारे टाकण्यात आलेल्या डक्टची इत्यंभूत माहीती सॉफ्ट कॉपी व हार्ड कॉपी मध्ये तयार करून अभिलेखे जतन करणे.

**(e) इतर किरकोळ कामे :–**

- हॉट मिक्स प्लॅन्ट विभागाच्या कार्यालयामधील दैनंदिन कामाच्या संदर्भात विभागप्रमुखास सहकार्य करणे.

## स्थापत्य अभियंत्रिकी सहाय्यक :– कर्तव्यसुची

- हॉट मिक्स प्लॅन्ट विभागाचे विभाग प्रमुख यांनी दिलेल्या निर्देशानुसार विभागीय सर्व कामांना सहकार्य करणे.
- कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी / स्थापत्य) यांना विभागीय कामांच्या अनुषंगाने सहकार्य करणे.

## प्लॅन्ट ऑपरेटर :– कर्तव्यसुची

हॉट मिक्स प्लॅन्ट विभागाचे विभागप्रमुख यांचे माताहात खालीलप्रमाणे कर्तव्य पार पाडणे.

- कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) यांचे निर्देशानुसार विभागाच्या आवश्यकतेप्रमाणे हॉट मिक्स प्लॅन्ट मधून उष्ण मिश्रीत डांबर तयार करणे.
- हॉट मिक्स प्लॅन्ट मधील साहित्याची (डांबर, गिट्टी, हिनकॉल) इत्यादी बाबत साठयाची माहिती कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) यांना देणे.
- कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) / स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक यांचेशी समन्वय साधून हॉट मिक्स प्लॅन्टचे ऑपरेटींग, दुरूस्ती व देखभालीचे काम योग्य रितीने पार पाडणे.
- हॉट मिक्स प्लॅन्टचे दुरूस्ती, देखभाल व ऑपरेशनच्या अनुषंगाने रेकॉर्ड अभिलेखे जतन करणे.

## ड्रायव्हर / ऑपरेटर :– कर्तव्यसुची

हॉट मिक्स प्लॅन्ट विभागप्रमुख यांचे माताहात खालीलप्रमाणे कर्तव्य पार पाडणे.

- विभागप्रमुख / कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी / स्थापत्य) / स्थापत्य अभियंत्रिकी सहाय्यक यांचे निर्देशानुसार कामे पार पाडणे.
- ड्रायव्हर / ऑपरेटर चालवित असलेले वाहने / मशिनरीज ची देखभाल व दुरूस्तीची कामे मॅकनिक / कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) यांचेशी समन्वय साधून योग्य रीतिने पार पाडणे व याबाबतची नोंद लॉगबुक मध्ये घेणे.
- वाहने / मशिनरीजने दररोज केलेल्या कामाची लॉगबुक मध्ये सविस्तर नोंद घेणे.

## मॅकनिक :– कर्तव्यसुची

हॉट मिक्स प्लॅन्ट विभागप्रमुख तसेच कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) यांचे माताहात खालीलप्रमाणे कर्तव्य पार पाडणे.

- विभागीय वाहने / मशिनरीजची दररोज तपासणी करून त्याबाबतचा अहवाल कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) यांचे कडे सादर करणे.
- विभागीय वाहने / मशिनरीज मध्ये बिघाड झाल्यास त्वरीत दुरूस्ती करून त्याबाबतची सुचना कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) यांना देणे.
- वाहने / मशिनरीजच्या दुरूस्ती / देखभालीची कामे केल्याची नोंद ठेवणे व देखभाल व दुरूस्ती करीता लागणारे सुटे स्पेअर पार्टस कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) यांचेशी समन्वय साधून मनपा दर सुची मधील मंजूर निविदाकारामार्फत मागवून काम करवून घेणे व त्याबाबतचा अहवाल सादर करणे.

## चपराशी :– कर्तव्यसुची

- कार्यालयात साफ सफाई करणे.
- विभागीय अधिकारी/कर्मचारी यांनी वेळोवेळी दिलेल्या सुचनांचे पालन करणे.
- कार्यालयीन डाक पोहचविण्याचे काम करणे.

## क्लिनर :– कर्तव्यसुची

- विभागीय वाहने/मशीनरीजचे ड्रायव्हर/ऑपरेटर यांना वाहनाचे देखभाल व दुरुस्ती करीता सहकार्य करणे.

## मजदूर :– कर्तव्यसुची

- प्लॅन्ट ऑपरेटर यांना हॉट मिक्स प्लॅन्टचे काम व तसेच मशीनरीजच्या देखभाल व दुरुस्तीच्या कामाकरीता सहकार्य करणे.

**5.** कर्तव्य पार पाडतांना खालील नियमावलींचे आधार घेतले जाते.

1. महाराष्ट्र अधिनियम 2012
2. केबल डक्ट गाईड लाईन्स 2013

**6.** दस्ताऐवजाच्या प्रवर्गाचे प्रकार खालील प्रमाणे आहे –

1. केबल डक्ट गाईड लाईन्सच्या आधारे विविध टेलीकॉम कंपण्यांचे करण्यात येणारे पत्र व्यवहार, त्या अनुषंगाने मागणीपत्र/परवानगी बाबतचे दस्तावेज तयार करून जतन केली जाते.
2. हॉट मिक्स प्लॅन्ट विभागाला लागणारे खडी/मुरूम/डस्ट/डांबर इत्यादीच्या साठा नोंदवही तसेच त्याअनुषंगाने करण्यात येणारे कामांचे विवरण इत्यादी बाबीचे दस्तावेज स्वतंत्रपणे जतन केले जाते.
3. हॉट मिक्स प्लॅन्ट तसेच त्या साठी लागणारे वाहने/मशीनरी ची खरेदी, दुरूस्ती व सुस्थिती इत्यादी बाबीचे दस्तावेज स्वतंत्रपणे जतन केले जाते.
4. माहितीच्या अधिकारात विचारण्यात येणारे प्रश्न व त्याबद्दलची उत्तरे तसेच अभिलेख स्वतंत्र बाबीचे दस्तावेज स्वतंत्रपणे जतन केले जाते.

**7.** लोकांशी विचार विनिमय करण्यासाठी किंवा लोकांकडून निवेदने केली जाण्यासाठी हॉट मिक्स प्लॅन्ट येथील पी.जी.आर, भ्रमणध्वनी व पत्राद्वारे लोकांची निराकरण करून त्याबाबतची अमंलबजावनी करण्यात येते.

**8.** निरंक

**9.** मनपाच्या वरीष्ठ अधिका-यांचे निर्देशा अनुसार अधिकारी तसेच कर्मचारी यांना आपल्या जबाबदा-या पार पाडाण्या लागतात.

**10.** अधिकारी व कर्मचा-याचे मासीक वेतन सोबत संलग्न आहे तसेच प्राधिकरणच्या नियमाप्रमाणे नुकसान भरपाई त्यांच्या मासीक वेतनातुन कपात करण्याची पध्दत आहे.

हॉट मिक्स प्लॅन्ट विभाग येथील नागपूर महानगरपालिका या सार्वजनिक प्राधिकरणातील अधिकाऱ्याचे व कर्मचाऱ्याचे पगार व भत्ते

| अ. क्र. | कर्मचाऱ्यांचे नांव | अधिकार पद | मुळ पगार | महागाई भत्ता | घरभाडे भत्ता | विशेष शहर भत्ता | विशेष भत्ता, प्रेवास भत्ता व प्रकल्प भत्ता | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 1 | राजेश गोविंदराव गुरमुळे | यांत्रिकी अभियंता | 28250 | 31922 | 5650 | 240 | 0 | 66062 |
| 2 | प्रशांत पुडंलिक सोनकुसरे | कनिष्ठ अभियंता | 21200 | 23956 | 4240 | 240 | 2100 | 51736 |
| 3 | शरद सिताराम सावरकर | स्थापत्य अभि. सहा. | 23510 | 26566 | 4702 | 240 | 1300 | 56318 |
| 4 | दिपक एकनाथजी मेश्राम | स्था. अभि. सहा. | 13780 | 15571 | 2756 | 240 | 1300 | 33647 |
| 5 | ढेकल भदुजी सोनेकर | प्लॅन्ट ऑपरेटर | 12570 | 14204 | 2514 | 240 | 450 | 29978 |
| 6 | ज्ञानेश्वर बलवंत खाडे | सहा. मेक्यानिक | 12300 | 13899 | 2460 | 240 | 450 | 29349 |
| 7 | गजानन नारायण आत्राम | वाहन चालक | 12570 | 14204 | 2514 | 240 | 450 | 29978 |
| 8 | रमेश गणपत शिंदे | वाहन चालक | 16130 | 18227 | 3226 | 240 | 450 | 38273 |
| 9 | मधुकर बळीराम नासरे | वाहन चालक | 16130 | 18227 | 3226 | 240 | 450 | 38273 |
| 10 | हरीभाऊ भाऊराव चार्लेवार | चपराशी | 10910 | 12328 | 2182 | 150 | 450 | 26020 |
| 11 | नंदकिशोर गोपाल तुमसरे | चपराशी | 9730 | 10995 | 1946 | 150 | 450 | 23271 |
| 12 | रामचंद्र दौलत कन्नाके | क्लिनर | 10780 | 12181 | 2156 | 240 | 0 | 25357 |
| 13 | चेतानंद तुकाराम कांबळे | क्लिनर | 11610 | 13119 | 2322 | 240 | 450 | 27741 |
| 14 | रवींद्र नथ्थुजी शस्त्रकार | क्लिनर | 11610 | 13119 | 2322 | 240 | 450 | 27741 |
| 15 | सुरेश विठलराव पारधी | क्लिनर | 5740 | 6486 | 1148 | 95 | 400 | 13869 |
| 16 | राकेश बाबुलाल पिल्ले | क्लिनर | 5740 | 6486 | 1148 | 95 | 400 | 13869 |
| 17 | संदीप शिवरतन सोनी | क्लिनर | 5740 | 6486 | 1148 | 95 | 400 | 13869 |
| 18 | शुभम मोरेश्वर बगमारे | क्लिनर | 5740 | 6486 | 1148 | 95 | 400 | 13869 |
| 19 | शंकर सदाशिव नौकरकर | मजदूर | 9890 | 11176 | 1978 | 150 | 450 | 23644 |
| 20 | अमरसिंग लक्ष्मण जरेरीया | मजदूर | 11610 | 13119 | 2322 | 240 | 450 | 27741 |
| 21 | जयपाल गनाजी राऊत | मजदूर | 11610 | 13119 | 2322 | 240 | 0 | 27291 |
| 22 | सत्यवतीबाई पाटील | मजदूर | 9950 | 11243 | 1990 | 150 | 450 | 23783 |
| 23 | श्रावण रामाजी मडावी | मजदूर | 10560 | 11933 | 2112 | 150 | 450 | 25205 |

11. हॉट मिक्स प्लॅन्ट अंतर्गत करण्यात येणारे सर्वे आयव्यय तपशील खर्च तक्त्यासोबत खालील प्रमाणे आहे –

**(रूपये लाखात)**

| अ. क्र. | जुणे व्यय पद क्र. | अर्थ संकल्पीय व्यय पद क्र. | व्यय पदाचे शिर्षक | 2015–16 चा प्रस्तावित | | विभागाची मागणी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | निगम आयुक्त द्वारा प्रस्तावित | स्थायी समिती द्वारा सुचित | प्रावधान |
| 1 | 248 | A7 20014 90601 | हॉट मिक्स प्लॅन्ट साठी माल बद्दल समायोजन | 300.0 | **350** लाख | 350.0 |
| 2 | 342 | A2 20014 30605 | शहरातील रस्त्यावरील खड्डयांची सुस्थिती व दुरूस्ती करणे. | 300.0 | **1000** लाख | 1000.0 |
| 3 | 360 | A2 20013 20101 | प्रशासकीय खर्च (निविदा अर्ज छपाई) | 2.0 | **2** लाख | 2.0 |
| 4 | 361 | A2 20014 30807 | फिरते देखभाल व दुरूस्ती पथकामार्फत सडक दुरूस्ती | Nil | **1** लाख | Nil |
| 5 | 366 | A2 20014 30809 | हॉट मिक्स प्लॅन्ट सुस्थिती व दुरूस्ती | 25.0 | **50** लाख | 50.0 |
| 6 | 369 | A2 20014 30110 | हॉट मिक्स प्लॅन्ट करीता इंधन खरेदी | 150.0 | **250** लाख | 250.0 |
| 7 | 671 | A4 20014 74614 | स्व. एकनाथराव जोग स्मृती नविन हॉट मिक्स प्लॅन्टचे निर्माण व नविन यंत्रसामुग्री खरेदी | 200.0 | **210** लाख | 300.0 |
| 8 | 675 | A2 20014 30808 | हॉट मिक्स प्लॅन्ट द्वारा रस्त्यांचे डांबरीकरण करणे | 200.0 | **800** लाख | 350.0 |
| 9 | 677 | A4 20014 74710 | हॉट मिक्स प्लॅन्ट करीता मशीन व यंत्रसामुग्री खरेदी | 300.0 | **350** लाख | 500.0 |
| 10 | 795 | A8 20014 90601 | माल व डांबर खरेदी | 300.0 | **350** लाख | 350.0 |
| **सन 2014–15 चे आय** | | | | | | |
| 1 | 161 | A1 20014 21601 | रोड कटिंग पासुन मिळणारी आय | | | 400.0 |

12. निरंक
13. निरंक
14. हॉट मिक्स प्लॅन्ट विभागाच्या कार्यप्रणालीत ई–गव्हनर्स/पी.जी.आर. इत्यादी इलेक्ट्रानिक स्वरूपाची तंत्रचा वापर करण्यात येते.
15. म.न.पा. नागपूरच्या वेबसाईटवर माहिती नागरीकांकरीता उपलब्ध करून देण्यात आली आहे.
16. अपिलीय अधिकारी – कार्यकारी अभियंता (प्र.)
श्री. महेश गुप्ता
माहीती अधिकारी – उपविभागीय अभियंता
श्री. राजेश गुरमुळे
सहाय्यक माहिती अधिकारी – शाखा अभियंता
श्री. प्रशांत सोनकुसले
17. निरंक